# ब्रिटीशकालीन नासिक जिल्ह्यातील शैक्षणिक विकास
# (इ. स. १९०० - १९१५)

**भोज छाया भास्कर**
**इतिहास विभाग , ओझरमिग रिध्दी सिध्दी बिल्डींग, शिवाजी नगर, ता. निफाड, जि. नाशिक.**



**लार्ड डलहौसीने**

**प्रस्तावना :-**

मे १८६४ मध्ये नासिक नगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर प्राथमिकशाळा नगरपालिकेकडे चालविण्यासाठी देण्यात आल्या. इंग्रजी भाषेचे महत्व वाढू लागल्यावर उर्दू शाळेत इंग्रजी वर्ग सुरु करण्यात आले. कलकत्ता येथिल 'बेथुन कॉलेज' स्वतः लार्ड डलहौसीने स्वखर्चाने चालवले होते. डलहौसिने वूडच्या खलित्यातील सर्व शिफारशी अंमलात आणून भारतात पाश्चात्य शिक्षणाचा पाया घातल्याचे दिसते. वूडच्या खलित्यापासुन ते हंटर कमिशन पर्यंत अनेक महत्वपुर्ण बदल शिक्षणक्षेत्रात घडून आल्याचे दिसते. वूडच्या खलित्याने शिक्षणक्षेत्रात एतद्देशीय लोकांना शैक्षणिक संस्था काढण्यास चालना मिळाली.

इ. स. १९०० - १९०१ या शौक्षणिक वर्षात नासिक शहरात संस्कृत स्कूल नावाची मुलांना शिक्षण देणारी १ शाळा कार्यरत होती. या शाळेत कनिष्ठ व वरिष्ठ स्तरावरील प्राथमीक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ५५ इतकी होती दैनंदिन सरासरी उपस्थिती ३० इतकी होती. शाळांच्या क्षैक्षणिक कार्यासाठी वरील वर्षात सरकाने प्रांतिक महसुलातून, वर्गणीतून अनुक्रमे १०० आणि ५३ रुपये खर्च केल्याचे दिसून येते.

नासिक येथिल शरणपुर येथे जी. एम. स्कूल नावाची मुलांना शिक्षण देणारी १ शाळा कार्यरत असून व अनुक्रमे तेथे विद्यार्थीसंख्या ७९ व २० इतकी होती. एकूण ९९ विद्यार्थी शिक्षण घेत होते.

इ. स. १९०० - १९०१ या शैक्षणिक वर्षात इगतपुरी येथे शासकिय मिडल स्कुल नावाची मुलांना शिक्षण देणारी एक शाळा कार्यरत होती. तेथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अनुक्रमे ६८ व ६ इतकी म्हणजे एकूण ७४ एवढी होती.

इ. स. १९०० - १९०१ या शैक्षणिक वर्षात नासिक येथे ए. व्हि. मिडल स्कूल नावाची मुलांना शिक्षण देणारी एक शाळा कार्यरत होती. या शाळेत विद्यार्थ्यांची एकूण संख्या ६० ऐवढी होती. तर विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती ८ इतकी होती. प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी १७९ रुपये खर्च केल्याचा उल्लेख आढळून येतो.

इ. स. १९०४ - ०५ या शैक्षणिक वर्षात नासिक येथील बुधवार पेठ येथे झेड एम. एस. बॉईज स्कुल नावाची मुलांना शिक्षण देणारी प्राथमिक शाळा कार्यरत होती. या शाळेत कनिष्ठ व वरिष्ठ स्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची एकुण संख्या ५० व ८ इतकी होती. एकुण विद्यार्थीसंख्या ५८ एवढी होती. विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी १ रु ८ आणे सरकारने खर्च केल्याचा उल्लेख अहवालात आढळतो.

इ. स. १९०४ - ०५ या शैक्षणिक वर्षात मालेगाव येथे पर्शियन स्कुल नावाची मुलांना शिक्षण देणारी प्राथमिक शाळा कार्यरत होती. कनिष्ठ व वरिष्ठ दोन्ही स्तरावर शिक्षण घेणारे ५९ विद्यार्थी होते. प्रत्येक विद्यार्थ्यासाठी १ रुपये ५ आणे ४ पैसे सरकारणे खर्च केल्याचा उल्लेख अहवालात आढळतो. इ. स. १९०४ - ०५ या काळात नासिक जिल्ह्यात मुंबई इलाख्यातील धोरणानुसार नगरपालिकेने शिक्षण प्रसारासाठी प्रयत्न सुरु केल्याने मुलांच्या संख्येबरोबरच मुलींची संख्या वाढत गेली. एकुण ४६२०० मुले तर ५७५३ मुली शिक्षण घेत असल्याचे दिसुन येते.

इ. स. १९०४ - ०५ या शैक्षणिक वर्षात नासिक जिल्ह्यात मुलांना शिक्षण देणाऱ्या अनुदानित ४५ प्राथमिक शाळा कार्यरत होत्या. या शाळेत कनिष्ठ व वरिष्ठ स्तरावरील प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची एकुण संख्या अनुक्रमे ८८६ व २३२ इतकी होती. दोन्ही स्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची एकुण संख्या १११८ एवढी होती. सरासरी उपस्थिती ८५४ इतकी होती. प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी १ रुपये ८ आणे २ पैसे सरकारणे खर्च केल्याचा उल्लेख अहवालात दिसून येतो.

इ. स. १९०५ - ०६ या शैक्षणिक वर्षात नासिक येथे नासिक म्युनिसिपल नावाची मुलांना शिक्षण देणारी माध्यमिक शाळा कार्यरत होती. या शाळेत एकुण १२० व १९६ म्हणजे ३१६ विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यांची दैनंदिन सरासरी उपस्थिती २८८ इतकी होती. शाळांच्या शैक्षणिक कार्यासाठी सरकारने प्रांतिक महसूलातून विद्यार्थ्यांकडून फी पोटी आणि वर्गणीतून अनुक्रमे ७७८३, ७४५९ व १ रुपये खर्च केल्याचे दिसून येते.

इ. स. १९०५ - ०६ या शैक्षणिक वर्षात नांदगाव येथे सी. एम. एस. बॉईज स्कूल नावाची मुलांना शिक्षण देणारी माध्यामिक शाळा कार्यरत होती. या शाळेत शिक्षण घेणारी माध्यमिक शाळा कार्यरत होती. या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची एकुण संख्या अनुक्रमे ११ व १ इतकी होती. दोन्ही स्तरावर एकुण १२ विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचे दिसून येते. प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी ७ रुपये १३ आणे ६ पैसे सरकारने खर्च केल्याचा उल्लेख अहवालात आढळतो.

इ. स. १९०५- ०६ या शैक्षणिक शैक्षणिक वर्षात शरणपुर येथे सी. एम. एस. गर्ल्स स्कूल नावाची मुलींना शिक्षण मध्यमिक शाळा कार्यरत होती. या शाळेत एकुण विद्यार्थीनी ९८ इतक्या होत्या. प्रत्येक विद्यार्थिनीवर ४ रुपये १ आणे ४ पैसे सरकारने खर्च केल्याचा उल्लेख अहवालात आढळतो.

इ. स. १९०५ - ०६ मध्ये मालेगाव येथे सी. एम. एस. गर्ल्स स्कूल नावाची मुलींना शिक्षण देणारी माध्यमिक शाळा कार्यरत होती. या शाळेत मध्य व उच्च स्तरावरील माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या अनुक्रमे ३३ व २ इतकी होती. दोन्ही स्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनींची एकुण संख्या ३५ एवढी होती. शाळेच्या शैक्षणीक कार्यासाठी अनुक्रमे सरकारने १२९ आणि २५८ रु खर्च केल्याचे दिसून येते. प्रत्येक विद्यासाठी ४ रुपये ७ आणे २ पैसे सरकारने खर्च केल्याचा उल्लेख आढळतो.

इ. स. १९०६ - ०७ या शैक्षणिक वर्षात नासिक येथे नासिक हायस्कूल नावाची मुलांना शिक्षण देणारी माध्यमिक शाळा कार्यरत होती. या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची एकुण संख्या अनुक्रमे १०० व २६८ म्हणजे एकुण ३६८ एवढी होती. विद्यार्थ्यांची सरासरी उपस्थिती २०४ इतकी होती. शाळेच्या शैक्षणिक कार्यासाठी सरकारणे प्रांतिक महसुलातून, विद्यार्थ्यांकडून फी पोटी आणि वर्गणीतून अनुक्रमे ७१५०, ७७३३ आणि ४ रुपये खर्च केल्याचे दिसुन येते प्रत्येक विद्यार्थ्यासाठी २१ रुपये ० आणे ९ पैसे सरकारणे खर्च केल्याचा अहवालात उल्लेख आढळतो.

इ. स. १९०६ - ०७ या शैक्षणिक वर्षात इगतपुरी येथे कॉन्व्हेंट स्कुल नावाची मुलांना शिक्षण देणारी माध्यमिकशाळा कार्यरत होती. या शाळेत एकुण ८० विद्यार्थी मध्य व उच्च स्तरावर शिक्षण घेत होते विद्यार्थ्यांची दैनंदिन सरासरी उपस्थिती ६१ होती. सरकाणे प्रांतिक महसुलातून, विद्यार्थ्याकडून फी पोटी आणि वर्गणीतून अनुक्रमे १०३५, १७३७ व १८२० रु खर्च केल्याचे दिसुन येते. प्रत्येक विद्यार्थ्यासाठी ७ रुपये ७ आणे ३ पैसे सरकारने खर्च केल्याचा अहवालात उल्लेख आढळतो.

इ. स. १९०८ - ०९ या शैक्षणिक वर्षात देवळाली येथे झेड. बी. स्कुल नावाची मुलांना शिक्षण देणारी माध्यमिक शाळा कार्यरत होती. एकूण ६६ विद्यार्थी या शाळेत असुन त्यांची सरासरी दैनंदिन उपस्थिती ५५ इतकी होती. शाळांच्या शैक्षणिक कार्यासाठी वरील वर्षात प्रांतिक महसुलातून, विद्यार्थ्याकडून फी पोटी व इतर उत्पन्नातून अनुक्रमे ६७७३ रु खर्च केल्याचे दिसुन येते. प्रत्येक विद्यार्थ्यासाठी १४ रुपये २ आणे सरकारने खर्च केल्याचा अहवालात उल्लेख आढळतो.

इ. स. १९०८ - ०९ या शैक्षणिक वर्षात शरणपुर येथे सी. एम. एस. बॉईज स्कुल नावाची मुलांना शिक्षण देणारी माध्यमिक शाळा कार्यरत होती या शाळेत ९० विद्यार्थ्यी शिक्षण घेत होते शैक्षणिक कार्यासाठी सरकारणे ३९१, ८० आणि २४७१ रुपये खर्च केल्याचे दिसुन येते. प्रत्येक विद्यार्थ्यासाठी ५ रु ८ आणे १ पैसे सरकारने खर्च केल्याचा उल्लेख अहवालात आढळतो.

इ. स. १९०९ - १० या शैक्षणिक वर्षात नाशिक येथे आदिलवार पेठेतील झेड एम. एस. स्कुल नावाची मुलांना शिक्षण देणारी माध्यमिक शाळा कार्यरत होती. या शाळेत ७० विद्यार्थी शिक्षण घेत होते. सरकारणे शैक्षणिक कार्यासाठी वरील वर्षात १२८ आणि ५२७ रु खर्च केल्याचा उल्लेख अहवालात आढळतो. प्रत्येक विद्यार्थ्यासाठी १ रु १२ आणे १० पैसे दिसुन येते.

इ. स. १९०९ - १० या शैक्षणिक वर्षात येवला येथे ए. व्हि. स्कुल नावाची मुलांना शिक्षण देणारी माध्यमिक शाळा कार्यरत होती. या शाळेत एकूण ५९ विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यांची दैनंदिन सरासरी उपस्थिती ४० इतकी होती. सरकारने प्रांतिक महसुलातून प्रत्येक विद्यार्थ्यासाठी ३३५, ५४४, ४३१ रुपये खर्च केल्याचे दिसून येते. प्रत्येक विद्यार्थ्यासाठी ८ रु ९ आणे ५ पैसे सरकारणे खर्च केल्याचा अहवालात आढळतो.

इ. स. १९१० - ११ या शैक्षणिक वर्षात नासिक येथे नासिक हायस्कूल नावाची मुलांना शिक्षण देणारी माध्यमिक शाळा कार्यरत होती. या शाळेत एकुण ४५१ विद्यार्थि शिक्षण घेत होते. सरकारने प्रांतिक महसुलातून अनुक्रमे १२४५०, ९२४२ रुपये खर्च केल्याचे दिसून येते. प्रत्येक विद्यार्थ्यासाठी २८ रु १५ आणे ३ पैसे सरकारणे खर्च केल्याचा उल्लेख अहवालात आढळतो.

इ. स. १९१० - ११ या शैक्षणिक वर्षात देवळाली येथे झेड बी. स्कूल नावाची मुलांना शिक्षण देणारी माध्यमिक शाळा कार्यरत होती. या शाळेत एकूण ८५ विद्यार्थी सहभागी होते. त्यांची दैनंदिन सरासरी उपस्थिती ७४ इतकी होती. सरकारणे शैक्षणिक कार्यासाठी अनुक्रमे वरील वर्षात १९६, ६५६० रुपये खर्च केल्याचे दिसुन येते. प्रत्येक विद्यार्थ्यासाठी २ रु ६ आणे ९ पैसे सरकारणे खर्च केल्याचा अहवालात उल्लेख आढळतो.

इ. स. १९१२ - १३ मध्ये झोरोस्ट्रियन मिशनतर्फे नासिकमध्ये बुधवार आणि रविवार पेठेत प्राथमिक शाळा चालविल्या जात होत्या. व्हिक्टोरीया गर्ल्स स्कुल ही इंग्रजी माध्यमाची शाळा सन १९१२ - १३ मध्ये सुरु झाली.

इ. स. १९१२ - १३ शैक्षणिक वर्षात नासिक येथे नासिक हायस्कूल नावाची मुलांना शिक्षण देणारी माध्यमिक शाळा होती. या शाळेत एकुण ४२४ विद्यार्थिसंख्या असून सरकारणे सरकारने प्रांतिक महसुलातून अनुक्रमे १६११, १२०६१ आणि ४५३ रुपये खर्च केल्याचे दिसून येते. प्रत्येक विद्यार्थ्यासाठी १६ रु १ पैसे सरकारणे खर्च केल्याचे दिसुन येते. इ. स. १९१३ डिसेंबर मध्ये आखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या ७० व्या अधिवेशन प्रसंगी नासिक येथे उदाजीराव महाराज पवार धार हेच अध्यक्षस्थानी होते तर स्वागताध्यक्ष म्हणून ना. शंकरराव विठ्ठल कदम कातरणीकर होते. जनरल सेक्रेटरी म्हणून श्री. रा. वी. वंडेकर, मा. नि. स. देशमुख विरुळ, मा. गोविंद हरबाराव साळवी उपस्थित असल्याचा उल्लेख आढळतो.

इ. स. १९१३ - १४ या शैक्षणिक वर्षात इगतपुरी येथील जी. आय. पी. आर. नावाची मुलांना शिक्षण देणारी माध्यमिक शाळा कार्यरत होती. या शाळेत एकूण ५४ विद्यार्थी शिकत होते. त्यांची दैनंदिन सरासरी उपस्थिती ४३ इतकी होती. शाळांच्या शैक्षणिक कार्यासाठी सरकारने वर्गणीतून १५५३, ९११ आणि ४०५ रुपये खर्च केल्याचे दिसुन येते. प्रत्येक विद्यार्थ्यासाठी ३० रु ७ आणे ३ पैसे सरकारने खर्च केल्याचा अहवालात उल्लेख आढळतो. इ. स. १९१४ मध्ये मराठा उदयोजी बोर्डिंगची स्थापना झाली. महाराष्ट्रात अनेक नामवंत शिक्षण संस्था होत्या त्यापैकीच नाशिक जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाज या संस्थेचे नाव महाराष्ट्रात अग्रक्रमाने घेतले जाते.

इ. स. १९१३ - १४ मध्ये नासिक जिल्ह्यात नगरपालिका मार्फत मुलांना शिक्षण देणाऱ्या एकुण २३ प्राथमिक शाळा कार्यरत होत्या. एकुण ४५९२ विद्यार्थी शिक्षण घेत असुन त्यांची दैनंदिन उपस्थिती ३४०६ इतकी होती. सरकारने प्रांतिक महसुलातून १५३२१, ७९९३ आणि १९०६० रुपये खर्च केल्याचे दिसून येते. प्रत्येक विद्यार्थ्यासाठी ४ रु ११ आणे खर्च केल्याचा अहवालात उल्लेख आढळतो.

इ. स. १९१५ मध्ये नासिक जिल्ह्यात नगरपालिके मार्फत मुलांना शिक्षण देणाऱ्या एकुण २६ शाळा कार्यरत होत्या. ४०२१ एवढी विद्यार्थी संख्या होती. दैनंदिन उपस्थिती ३२२२ एवढी होती. प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी सरकारने ३ रुपये १३ आणे खर्च केल्याचा उल्लेख आढळतो.

**समारोपः**

नासिक जिल्ह्यातील शैक्षणिक विकासाच्या वाटचालित सरकारने दिलेल्या अनुदानामुळेच मोलाची भर पडल्याची दिसते तसेच खाजगी संस्थांनी केलेल्या कार्यामुळे शैक्षणिक इतिहास उंचावतांना दिसुन येतो. ब्रिटिश साम्राज्याच्या प्रारंभिच्या प्राथमिक शाळा, इंग्रजी भाषेचा लोकमतावरील पगडा इत्यादी घटकांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**ब्रिटिशकालीन नासिक जिल्ह्यातील शैक्षणिक विकास (इ. स. १९०० ते १९१५)**

| अ. क्र. | शाळेचे नाव | इ.स.वर्ष | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १. | संस्कृत स्कूल नासिक | १९०० - १९०१ | ५५ |
| २. | जी. एम. स्कूल शरणपुर, नाशिक | १९०० - १९०१ | ९९ |
| ३. | शासकीस मिडल स्कूल इगतपुरी | १९०० - १९०१ | ७४ |
| ४. | ए. व्हि. मिडल स्कुल नासिक | १९०० - १९०१ | ६० |
| ५. | झेड एम. एस. बॉइज स्कूल, नासिक | १९०४ - १९०५ | ५८ |
| ६. | पर्शियन स्कूल मालेगाव | १९०४ - १९०५ | ५९ |
| ७. | नासिक स्कूल (४५ प्राथ. शाळा) | १९०४ - १९०५ | १११८ |
| ८. | नासिक म्युनिसिपल माध्य. शाळा | १९०५ - १९०६ | ३१६ |
| ९. | सी. एम. एस. बॉईज स्कूल नांदगाव | १९०५ - १९०६ | १२ |
| १०. | सी. एम. एस. गर्ल्स स्कूल शरणपूर | १९०५ - १९०६ | ९८ |
| ११. | सी. एम. एस. गर्ल्स स्कूल मालेगाव | १९०५ - १९०६ | ३५ |
| १२. | नासिक हायस्कूल माध्य. शाळा | १९०६ - १९०७ | ३६८ |
| १३. | कॉन्व्हेंट स्कूल इगतपुरी माध्य. शाळा | १९०६ - १९०७ | ८० |
| १४. | झेड बी. स्कूल देवळाली माध्य. शाळा | १९०८ - १९०९ | ६६ |
| १५. | शरणपूर सी. एम. एस. बॉइज स्कूल | १९०८ - १९०९ | ९० |
| १६. | आदित्यवार पेठ नासिक झेड एम.एस. स्कूल | १९०९ - १९१० | ७० |
| १७. | ए. व्हि. स्कूल येवला | १९०९ - १९१० | ५९ |
| १८. | नासिक हायस्कूल | १९१० - १९११ | ४५१ |
| १९. | झेड बी. स्कूल देवळाली | १९१० - १९११ | ८५ |
| २०. | नासिक हायस्कूल | १९१२ - १९१३ | ४२४ |
| २१. | जी. आय. पी. आर. इगतपुरी स्कूल | १९१३ - १९१४ | ५४ |
| २२. | नासिक नगरपालिका २३ प्राथ. शाळा | १९१३ - १९१४ | ४५९२ |
| २३. | नासिक नगरपालिका २६ प्राथ. शाळा | १९१४ - १९१५ | ४०२१ |

**संदर्भ :-**


1. SF 4 Pg No - 21
2. SF 4 Pg No - 29
3. धारणकर सरल प्रकाश, स्त्रीजीवन विषयक स्थित्यंतरे नासिक जिल्हा, (१८७६- १९५०) पृष्ठ - १००
4. SF 4 Pg - 29
5. Report on the Administrative of the Bombay presideny 1905-06 Government central press, Bombay 1905-06 subsedary form No 2 Pg No 18
6. Subsedary From No - 2 Pg No - 23

7. Subsedary From No - 2 Pg No - 20
8. Subsedary From No - 2 Pg No - 22
9.नागपुरे ब. रा. शिक्षण आणि शिक्षणसंस्था नाशिक
10 Subsedary From No - 3 Pg No - 25
11. Subsedary From No - 3 Pg No - 29
12. Subsedary From No - 2 Pg No - 31
13. Subsedary From No - 2 Pg No - 23
14.नाशिक नगरपालिका जीवनगंगा अहवाल पृ - १७९
15. Subsedary From No - 3 Pg No - 28
16. Subsedary From No - 2 Pg No - 22
17. Subsedary From No - 2 Pg No - 23
18. धारणकर सरल प्रकाश, स्त्रीजीवन विषयक स्थित्यंतरे नासिक जिल्हा (१८७६-१९५०) पृ - ९९
19. आखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद, शताब्दी महोत्सव वर्ष २००७, स्मरणिका, प्रकाशक - उत्तमराव पाटिल, आखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद, पुणे पृ - १०९
20. नासिक जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाज, नाशिक अहवाल अमृतकुंभ.
21. Subsedary From No - 5 Pg No - 36
22. Subsedary From No - 4 Pg No - 34